Project Genesis

# Global Business Foundation Skill

## Faculty Development Program

Infosys BPO



12th July to 20th July 2017
Pune, Maharashtra

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**

Central Training & Placement Office,
University Campus,
Aurangabad-431 004 (M.S.) India

NAAC Accredited by 'A' Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**

ट्रेनिंग व प्लेसमेंट कार्यालय
विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद - ४३१ ००४ (म.रा.) भारत

E-mail : tpo@bamu.ac.in
Mobile No. 9011000666

फॅक्स क्र. : २४०३३३५
टेलिफोन : ०२४० - २४०००५७
वेब साईट : www.bamu.ac.in

जा. क्र. विरोवस्वरोमाका / २०१७- १८/ 607-608

दि. १९/०५/२०१७

परिपत्रक क्र. १ इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल / प्लेसमेंट सेल / २०१७- १८

## परिपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठ व इन्फोसिस कंपनीच्या सामंजस्य करारान्वये विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक तसेच विद्यापीठ विभागातील प्राध्यापक यांना इन्फोसिस कंपनी मध्ये जाऊन दहा दिवसीय प्रशिक्षण घेण्याची संधी (FDP – Faculty Development Program) १९ जून २०१७ ते २७ जून २०१७ या दरम्यान उपलब्ध करून दिली जाणार आहे. इंग्लिश कम्युनिकेशन स्किल्स, व्यक्तिमत्व विकास, तर्कशास्त्र, बुद्धिमत्ता विकास इ. विषयासंदर्भात हे प्रशिक्षण प्राध्यापकांना दिले जाणार असून पदवी तसेच पद्व्योत्तर विद्यार्थ्यांना शिकविणारे प्राध्यापक / शिक्षक अथवा या प्रकारचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यास इच्छुक असलेले कोणत्याही विषयाचे प्राध्यापक प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

इन्फोसिस मध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर आपल्या विभागातील / महाविद्यालायातील विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण द्यावे व त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच इन्फोसिस तर्फे घेण्यात येणाऱ्या कॅंपस मुलाखतींमधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड व्हावी व त्यांना रोजगाराची संधी प्राप्त व्हावी हा मुख्य हेतू या प्रशिक्षणाचा आहे.

इच्छुक प्राध्यापकांनी परिपात्राकासोबत जोडलेला नमुना अर्ज व हमीपत्र विभागप्रमुखांच्या / प्राचार्यांच्या सहीने विद्यापीठ प्लेसमेंट सेलचे अधिकारी डॉ. गिरीश काळे यांचेकडे दि. ५ जून २०१७ पूर्वी सादर करावे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर निवडक प्राध्यापकांना प्रशिक्षणाची संधी दिली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

या संदर्भातील अधिक तपशील पुरवणी क्र. १ वर दिला आहे. अधिक माहिती करिता डॉ. गिरीश काळे, प्लेसमेंट ऑफिसर, यांच्याशी विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, विद्यापीठ परिसर येथे संपर्क साधावा. संपर्क क्र. ९०११०००६६६.

विद्यापीठ प्रांगण )(
औरंगाबाद ४३१ ००४ )(
संदर्भ: - विरोवस्वरोमाका / २०१७- १८/ 607-608 )(
दिनांक: - १९/०५/२०१७ )(

कुलसचिव

या परिपत्रकाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी : -

१) सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२) सर्व विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगबाद.

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**

Central Training & Placement Office,
University Campus,
Aurangabad-431 004 (M.S.) India

NAAC Accredited by 'A' Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**

ट्रेनिंग व प्लेसमेंट कार्यालय
विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद - ४३१ ००४ (म.रा.) भारत

E-mail : tpo@bamu.ac.in
Mobile No. 9011000666

फॅक्स क्र. : २४०३३३५
टेलिफोन : ०२४० - २४०००५७
वेब साईट : www.bamu.ac.in

जा. क्र. विरोवस्वरोमाका / २०१७- १८/ 607-608 — दि. १९/०५/२०१७

परिपत्रक क्र. १ इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल / प्लेसमेंट सेल / २०१७- १८

## पुरवणी क्र. १

### इन्फोसिस येथील शिक्षक / प्राध्यापक प्रशिक्षणाचा तपशील
### (Faculty Development Program Details)

प्रशिक्षण दिनांक: - १९ जून २०१७ रोजी सकाळी ९ वा. पासून ते २७ जून २०१७ रोजी संध्याकाळी ६ वा. पर्यंत.

नावनोंदणी: - परिपत्रकासोबत दिलेला नमुना अर्ज इच्छुक शिक्षक / प्राध्यापकाने स्वतः भरावयाचा असून त्यावरील हमीपत्रावर इच्छुक शिक्षक / प्राध्यापक तसेच संबंधित विभागप्रमुख / प्राचार्य यांनी सही करून स्कॅन कॉपी *tpo@bamu.ac.in* या इमेल वर दि. ५ जून २०१७ रोजी संध्याकाळी ५ वा. पर्यंत पाठवायची आहे. मूळ प्रत दि. १० जून पर्यंत "डॉ. गिरीश काळे, प्लेसमेंट अधिकारी, विद्यापीठ कौशल्य विकास उद्योजकता व रोजगार कार्यालय, विद्यापीठ परिसर औरंगाबाद, ४३१००४" या पत्त्यावर पाठवायची आहे.

छाननी समिती: - उपलब्ध अर्ज विद्यापीठाने नियुक्त केलेल्या छाननीसमितीतर्फे तपासले जातील व या समितीच्या मान्यतेनंतरच शिक्षक / प्राध्यापकांना प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी संमतीपत्र देण्यात येईल.

मूळ हेतू: - इन्फोसिस प्रशिक्षणामध्ये मिळणारे विविध विषयाचे प्रशिक्षण आपल्या विभागातील / महाविद्यालयातील विध्यार्थ्यांना द्यायचे आहे जेणेकरून विद्यार्थ्यांचे इंग्लिश बोलण्याचे कौशल्य, बुद्धिमत्ता व व्यक्तिमत्व विकास होऊन त्यांचे रोजगार कौशल्य वाढेल व त्या विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त करण्यास मदत होईल.

प्रशिक्षण शुल्क: - हे प्रशिक्षण इन्फोसिस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामंजस्य कराराचा भाग असून या प्रशिक्षणासाठी कोणत्याही शिक्षक / प्राध्यापक तसेच महाविद्यालयास शुल्क द्यावे लागणार नाही.

प्रवास व इतर खर्च : - प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी येणारा प्रवास खर्च हा संबंधित विभाग / महाविद्यालयाने करावयाचा आहे. इन्फोसिस येथे राहण्याचा तसेच जेवण, नाश्ता इ. खर्च इन्फोसिस तर्फे केला जाईल. राहण्याची सोय इन्फोसिस प्रशिक्षण संस्थेच्याच आवारात केली जाईल.

प्रशिक्षणाची वेळ: - दि. १९ ते २७ जून पर्यंत प्रशिक्षण सकाळी ९ ते सायंकाळी ६ वा. पर्यंत नियोजित आहे. या कालावधीत १००% उपस्थिती अनिवार्य आहे. (रविवारी दि. २५ रोजी प्रशिक्षणास सुटी असेल.)

प्रमाणपत्र: - नियोजित प्रशिक्षण सर्वार्थाने पूर्ण करणाऱ्या शिक्षक / प्राध्यापकांना इन्फोसिस तर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल.

कुलसचिव

नॅक द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल व ट्रेनिंग व प्लेसमेंट कार्यालय

---

### इन्फोसिस येथील शिक्षक / प्राध्यापक प्रशिक्षणासाठी नामांकन अर्ज

१) विद्यापीठ विभाग / महाविद्यालयाचे नाव :- ______________________

२) प्रशिक्षणास उपस्थित राहणाऱ्या शिक्षकाचे / प्राध्यापकाचे नाव व पत्ता :- ______________________

______________________

______________________

३) विद्यापीठ मान्यता (महाविद्यालयांकरिता) :- आहे / नाही ______________________

४ ) अध्यापनाचा अनुभव :- ________ वर्षे ______________________

५) मोबाईल क्र. :- ______________________

६) इमेल आयडी :- ______________________

परिपत्रक क्र. १ इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल / प्लेसमेंट सेल / २०१७- १८, दि. १९/०५/२०१७ मधील पुरवणी क्र. १ मध्ये नमूद केलेला प्रशिक्षणाचा हेतू मी वाचला असून तो हेतू साध्य करण्याच्या उद्देशानेच मी हे प्रशिक्षण घेऊ इच्छितो / इच्छिते. विद्यापीठातर्फे कळवण्यात आलेल्या तारखा व वेळेप्रमाणे मी पूणे येथे उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण करेन.

प्राध्यापकाचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

वरील नामांकन पत्रामध्ये नमूद केलेली माहिती पूर्णतः सत्य असून सदरील शिक्षक / प्राध्यापक इन्फोसिस येथे प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर विभागातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देतील. यासाठी लागणारी सर्व व्यवस्था विभाग / महाविद्यालय स्तरावर केली जाईल.

सही व शिक्का<br>प्राचार्य / विभाग-प्रमुख

*छाननी समितीचा शेरा*

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------